# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.05.2025** **वार- गुरुवार**

---

**एनडीए**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षण पूर्ण करून भारतीय सैन्य दलात दाखल होणाऱ्या पहिल्या महिला तुकडीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे. ही तुकडी समस्त महिलांसाठी आदर्श आहे, असं प्रतिपादन गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाच्या कुलगुरू डॉक्टर पूनम टंडन यांनी आज पुण्यात केलं. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४८व्या तुकडीचा दीक्षांत सोहळा आज पार पडला; या सोहळ्याला डॉक्टर पूनम टंडन प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रबोधिनीचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल गुरुचरण सिंग, प्राचार्य ओ पी शुक्ला यावेळी उपस्थित होते. या सोहळ्यात ३३९ छात्रांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये १७ महिलांचा समावेश आहे. छात्र श्रीती दक्ष महिला तुकडीमध्ये कला शाखेत प्रथम आली. श्रीतीला कमांडंट रौप्य पदकाने सन्मानित करण्यात आलं. बिटेक शाखेचं कमांडंट रौप्य पदक उदयवीर सिंग नेगी याला, विज्ञान शाखेचं लकी कुमार याला; तर संगणक विज्ञान शाखेचं पदक प्रिन्स कुमारसिंग कुशवाह याला प्रदान करण्यात आलं. या सोहळ्यात ८४ जणांना विज्ञान, ८५ जणांना संगणक विज्ञान, तर ५९ जणांना कला शाखेची, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये १७ मित्र देशांच्या छात्रांचाही समावेश आहे. महिलांच्या पहिल्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा उद्या सकाळी होणार आहे; या कार्यक्रमाला मिझोरामचे राज्यपाल आणि माजी लष्कर प्रमुख व्ही के सिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**चित्रपटमहोत्सव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि चिंचवड फिल्म सोसायटीतर्फे आजपासून पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला सुरुवात झाली. येत्या शनिवारपर्यंत सुरू राहणाऱ्या या महोत्सवात आंतरराष्ट्रीय स्तरावरील ९० चित्रपट, लघुपट, माहितीपट, अ‌ॅनिमेशनपट मोफत दाखवण्यात येणार आहेत. शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असं आवाहन महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केलं आहे.

**अहिल्यादेवीहोळकर**

लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विचार प्रबोधन पर्वाचं आयोजन करण्यात आलं आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते आज या कार्यक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं. या तीन दिवसांच्या प्रबोधन पर्वामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श वाटचालीचं दर्शन घडवणारं 'पुण्यश्लोक' हे ६४ कलाकारांचं भव्य महानाट्य, महाराष्ट्राच्या प्राचीन संस्कृतीचं दर्शन घडवणारा लोकोत्सव कार्यक्रम, लोकसंगीताचा कार्यक्रम, तसंच अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित व्याख्यान होणार आहे.

**जागतिकपर्यावरणदिन**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'आरंभ फाउंडेशन' आणि 'नाटकाची शाळा' या संस्थांनी येत्या ५ जून रोजी पुण्यात 'ग्रीन थिएटर फेस्टिव्हल' आयोजित केला आहे. या महोत्सवात पर्यावरणविषयक तीन नाटकं सादर केली जाणार आहेत. एरंडवणे इथल्या द बॉक्स नाट्यगृहात सादर होणारी ही नाटकं सर्वांसाठी विनामूल्य खुली आहेत.

**<u>फुलेस्मारक</u>**

पुण्यातील महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय स्मारक या दोन्ही वास्तू एकत्रित करून त्याचा विस्तार करण्याचं निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी राज्य सरकारने निधीदेखील उपलब्ध करून दिला आहे. यासाठी या दोन्ही स्मारकांना जोडणाऱ्या जागा ताब्यात घ्याव्या लागणार आहेत. संबंधित मिळकतदारांना याचा मोबदला देण्याबाबत महापालिकेने सर्वेक्षण सुरू केलं असल्याचं महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी सांगितलं.

**<u>दूधउत्पादकसंघ</u>**

सर्व दूध संघांनी दूध विक्रीच्या दरात दोन रुपयांनी वाढ केली असली, तरी पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने म्हणजे कात्रज डेयरीनं ग्राहकांचा विचार करून गायीच्या दूध विक्री दरात वाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे. संघाचे अध्यक्ष स्वप्नील ढमढेरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती कळवली आहे.

**<u>योगेशटिळेकर</u>**

पुण्यात गुरुवार पेठेतील प्रार्थनास्थळाच्या अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई करून तिथल्या आरक्षित जागा पुणे महानगरपालिकेने ताब्यात घ्याव्यात, अशी मागणी विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी केली. या अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या अतिक्रमणांविरोधात सकल हिंदू समाजाच्या वतीने आमदार योगेश टिळेकर यांच्या नेतृत्वात काल रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज पावसानं विश्रांती घेतली आहे; आज दिवसभर आकाश निरभ्र होतं. कमाल तापमान ३२ तर किमान तापमान २३ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या आकाश अंशत: ढगाळ असेल तसंच हलक्या पावसाचाही पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**